पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/०९/२०२३
## दि.११/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

| | |
|---|---|
| १ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६२२/२०२३,भादविक ४२०,१७० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २१ वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम,वय २५ ते ३० वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०२३ रोजी रात्रौ २१/०० वा.कुमार सिटी सोसायटीच्या गेट जवळ,कल्याणीनगर, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आदर्शनगर,कल्याणीनगर,पुणे येथे पेईंग गेस्ट म्हणुन राहण्यास आहेत. फिर्यादी हे त्यांचा रुममेट याचेसह कल्याणीनगर परीसरात फेर फटका मारण्यासाठी पायी जात असताना,यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांची फसवणुक करण्याचे उददेशाने,तो सिक्रेट पोलीस असल्याची बतावणी करुन,फिर्यादी व त्यांचा रुममेट यांचे मोबाईल फोन तपासण्याचा बहाणा करुन,फिर्यादी यांचेकडील १०,०००/- रूपये किचा व रूममेट याचेकडील ७,०००/- रुपये किंचा असे दोन मोबाईल फसवणुक करून घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९८२३५५६७१३ |
| २ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १६७/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २७ वर्षे,रा.४७४,बुधवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १०/०९/२०२३ रोजी रोजी १९/३६ वा.८६५,बुधवार पेठ,सोन्या मारूती चौक,पुणे येथील ज्वेलर्सचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ८६५ बुधवार पेठ,सोन्या मारूती चौक,पुणे येथे सोने-चांदी विक्रीचे दुकान आहे. फिर्यादी हे त्यांचे दुकानात कामगारांसह हजर असताना,यातील नमुद दोन अनोळखी महिला यांनी सोने खरेदीचे बहाण्याने फिर्यादी यांचे दुकानात येवुन,सोन्याचा नेकलेस दाखविण्यास सांगुन,फिर्यादी यांचे कामगाराची नजर चुकवुन,दुकानातील सोन्याचा नेकलेस ७,१६,२८०/- रु किंमतीचा चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, मनोज अभंग ८१०८११०६५१ |
| ३ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ५७१/२०२३,भादविक ३८५,३२३,४२७,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२०,रा.लोणी-काळभोर,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | १.शिवम जयपाल सिंग ऊर्फ मुन्ना,वय-२७ वर्षे २.तुषार संजय थोरात,वय-१९ वर्षे ३.निखील दिलीप कांबळे,वय-१९ वर्षे (अटक) व इतर एक अनोळखी कार्यकर्ता |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/९/२०२३ रोजी रात्री २०/०० वा.लोणी स्टेशनचे समोर,लोणी-काळभोर,ता.हवेली,जि.पुणे येथे किराणा दुकानात |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मामेभाऊ याचेसह त्यांचे किराणा दुकानात नेहमीप्रमाणे काम करीत असताना,यातील नमुद श्रीमंत काळभैरवनाथ प्रतिष्ठान मंडळाचे व अष्टविनायक मंडळाचे कार्यकर्ते यातील नमुद इसमांनी संगनमत करुन,धार्मिक कार्यक्रमाकरीता फिर्यादी यांचेकडे ३,०००/- रुपयेची वर्गणी मागणी केली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना स्वइच्छेने १०१/- रुपये वर्गणी देण्यास तयार असताना,फिर्यादी यांना ३,०००/- रुपयेच वर्गणी मागण्याचा तगादा लावुन फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करून,दुकानातील कॅल्क्युलेटर व मोबाईलची तोडफोड केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. किरण धायगुडे ८८८८८२००२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**